R.No.MAHMAR/25/A3029

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

दैनिक
# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक १०१ बुधवार दि.२९ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# फेब्रुवारी मध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

## १७ते१९फेब्रुवारी२०२६या कालावधीत आयोजन तीसहून अधिक देशां मधील अभ्यासक,पर्यावरण तज्ज्ञ,आणि धोरणकर्त्यांचा समावेश

मुंबई(प्रतिनिधी)दि.वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह-'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई'या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली.या वेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे,महापालिका आयुक्त भूषण गगराणी,विभागाच्या सचिव जयश्री भोज,प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.या वेळी'मुंबई क्लायमेट वीक'च्या लोगोचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. विकसनशील देशांतील वातावरणीय बदल,अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल,असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम१७ते१९फेब्रुवारी,२०२६या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर,मुंबई येथे पार पडेल.त्याच बरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे,यासाठी शहर भर विविध प्रदर्शने,कार्यशाळा, चित्रपट,कलाक्रीडा,आरोग्य आणि अध्यात्म यांच्या शी निगडीत उपक्रम,आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे ही त्यांनी सांगितले. या परिषदेत ग्लोबल साऊथ मधील३०पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री,विविध शहरांचे प्रतिनिधी,उद्योग, सामाजिक संस्था,विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे.अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.या वेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो.माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन,मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य,नाविन्यपूर्ण,चांगल्या निधी सह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत. ग्लोबल साउथ मधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रा मधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे.असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,मुंबईत पहिल्यांदाचमुंबई क्लायमेट वीककार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे. या साठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला,प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामां विरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे. मुंबईक्लायमेटवीककार्यक्रम आयोजित केल्या नंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील,हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील.त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले. तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक,पर्यावरण तज्ज्ञ,आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदला वरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील.हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल,असेही ते म्हणाले. मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल.न्याय,नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी कार्यक्रमा बद्दल माहिती देताना सांगितले की,मुंबई क्लायमेट वीक हा महाराष्ट्र आणि भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. वातावरणीय बदलाला तोंड देण्यासाठी लोक सहभागावर आधारित असे शाश्वत आणि समावेशक उपाय या परिषदेतील मंथनातून तयार होतील. या उपक्रमाचे नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असणार असून क्लायमेट ग्रुप,इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह,वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिटस्ट्यूट(इंडिया),एव्हरसोर्स,एचटी पारेख फाउंडेशन,युनिसेफ,शक्ती फाउंडेशन,रेनमॅटर फाउंडेशन,नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या संस्था यात सहभागी होणार आहेत. मुख्यमंत्री कार्यालयातील यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे,सचिव श्रीकर परदेशी,मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे,प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई,जलज दाणी आदी यावेळी उपस्थित होते.

## व्ही एस पँथर्स च्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश लातूर शहरातील स्टेच्यु ऑफ नॉलेज च्या उभारणीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली

लातूर : लातूर शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील प्रस्तावित स्टॅच्यू ऑफ नॉलेज भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी स्मारकासाठी गेल्या अनेक दिवसापासून विधिमंडळामध्ये मान्यता देण्यात आली होती परंतु त्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली नव्हती यासाठी व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले औसा तालुक्याचे आमदार अभिमन्यू पवार साहेब यांची भेट घेऊन वारंवार निवेदने देऊन याचा




सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आणि आज या पाठपुराव्याला यश मिळाले आहे . स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे पत्र लातूर शहर महानगरपालिकेला प्राप्त झाले आहे आता प्रस्तावित स्टॅच्यू ऑफ नॉलेजचे काम लवकरात लवकर सुरू करून पूर्णत्वास न्यावे अशी मागणी व्हीएस पँथर्स च्या वतीने करण्यात येणार आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्याचा हा अतिशय आनंददायी निर्णय असल्याचे भावना विनोद भाऊ खटके यांनी व्यक्त केली.

## रामेश्वर नगरीत विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची उभारणी लवकरच लोकार्पण सोहळा होणार - डॉ. प्रा. विश्वनाथजी कराड

लातूर : - सर्वधर्मसमभाव आणि विश्वबंधुत्वाचा एक नवा आदर्श निर्माण करणाऱ्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर (रुई) हे महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील स्वावलंबी व आदर्श गाव म्हणून उदयास आले असून येथे भव्य दिव्य उभारण्यात आलेल्या 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला 'वसुधैव कुटुंबकम्' व 'एकं सत् विप्रा बहुदा वदंती' हा मानवतेचा संदेश देण्याचा प्रयत्न आहे अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिली.





राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी एक आदर्श व स्वयंपूर्ण खेडे कसे असावे, याची संकल्पना मांडली या संकल्पनेला अनुसरून डॉ. प्रा. विश्वनाथजी कराड यांच्या पुढाकाराने रामेश्वर (रुई) येथे आदर्शवत् व स्वावलंबी असे खेडे निर्माण करण्यासाठी ग्रामस्थांसोबत, रामेश्वर (रुई) गावाचे रूप पालटून आता त्याची विश्वधर्मी मानवता तीर्थ अशी ओळख निर्माण झाली आहे. प्रभु श्रीराम मंदिर, जामा मस्जिद व हजरत जैनुद्दिन चिस्ती दर्गा याचे पुर्ननिर्माण रामेश्वर (रुई) गावातील समस्त हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्रित येऊन केले व सर्वधर्मसमभाव आणि विश्वबंधुत्वाचा एक नवा आदर्श भारतासमोर ठेवला. त्याचप्रमाणे, भारतातील सर्वात मोठा लाल मातीचा कुस्ती आखाडा, ग्रामीण रुग्णालय व वाचनालय, सर्व धर्मांचा संदेश देणारा विश्वधर्मी श्रीराम-रहीम मानवता सेतू, तथागत भगवान गौतम बुद्ध विहार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती भवन, रामेश्वर (रुई) चे श्रद्धास्थान असलेले संत श्री गोपाळबुवा महाराज यांचे अत्यंत सुंदर समाधी मंदिर अशा विविध समाजोपयोगी उपक्रमातून रामेश्वर (रुई) हे महात्मा गांधींच्या स्वप्नातले स्वावलंबी व आदर्श गाव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथे साकार होत असून याबाबत माहिती देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेस डॉ. प्रा. विश्वनाथजी कराड यांच्यासह प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड, डॉ. महेश थोरवे आणि गिरीश दाते यांची उपस्थिती होती यावेळी बोलताना डॉ. प्रा. विश्वनाथजी कराड म्हणाले की, विश्वशांती, सर्वधर्मसमभाव, विश्वबंधुत्व आणि मानवतेचा संदेश देणारी एकमेवाद्वितीय वास्तु रामेश्वर (रुई) येथे साकार होत असून या वास्तूस 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' असे नामकरण करण्यात आले आहे. भारतीय संस्कृतीचे 'वसुधैव कुटुंबकम्' व 'एकं सत् विप्रा बहुदा वदंती' हे संदेश जगाला विनाशापासून वाचवू शकतात, अशी आमची धारणा आहे आणि हाच संदेश एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा हा प्रयत्न आहे.

विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन हे २५० फूट लांब आणि ९० फूट रुंद एवढ्या मोठ्या छताचे उभारणी केली असून भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्त्वज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीकच म्हणावे लागेल. या भवनात मानवतेचा इतिहास घडविणाऱ्या अनेक थोर संत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ यांच्या भव्य चित्रांमधून आणि त्यांच्या संदेशांमधून मानवता भवनाचे एक आगळेवेगळे दर्शन समाजाला घडेल यात शंका नाही या भवनाचा योग ध्यानधारणा व ओंकार साधना, केंद्र, सरपंच परिषद तसेच इतर ग्रामपंचायती संबंधी कार्यक्रम, कृषी मेळावे, कुस्ती स्पर्धा तसेच टेबलटेनिस, कॅरम इ. इनडोअर खेळ, रक्तदान शिबिरे, विविध विषयांवरच्या परिषद, चर्चासत्र, कार्यशाळा, मुलांसाठी संस्कार शिबिरे, महिला बचत गटांच्या बैठका / मेळावे, लोकशिक्षण व साक्षरता कार्यक्रम, पत्रकारांसाठीचे मेळावे, लोकोपयोगी प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम, वारकरी प्रशिक्षण केंद्र, भागवत सप्ताह, भजन / कीर्तन / भारूड संबंधी कार्यक्रम, विविध वस्तूंचे प्रदर्शन या शिवाय इतर विविध लोकोपयोगी कार्यक्रमाठी वापर केला जाणार आहे.

सदरील रामेश्वर (रुई) येथे साकारण्यात आलेल्या 'अद्वितीय विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन' या वास्तूचा लोकार्पण सोहळा १४ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे या कार्यक्रमास देशभरातीलच नव्हे तर जगभरातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहे. अत्यंत अस्मरणीय असा लोकार्पण सोहळा होईल अशी ही माहिती डॉ. प्रा. विश्वनाथजी कराड यांनी दिली.

## पर्यटन विकास योजनेतून १९ गावातील विकास कामासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून २ कोटी रूपयाचा निधी मंजूर

लातूर : - प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १९ गावातील विविध विकास कामासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने त्या त्या गावातील मंदिर परिसराचा विकास होणार असल्याने ग्रामस्थातून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.




लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावात राज्याच्या पर्यटन विकास योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी राज्याचे पर्यटन मंत्री ना. शंभूराजे देसाई यांच्याकडे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १९ गावाअंतर्गत विविध कामासाठी तब्बल २ कोटी रुपयांचा निधी राज्याच्या पर्यटन विभागाने २८ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघातील १९ गावात, लातूर तालुक्यातील १०, रेणापूर तालुक्यातील ६ आणि भादा सर्कल मधील ३ गावाचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका - भडी काशी विश्वेश्वर मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, नागझरी नागनाथ मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कासारखेडा महादेवदास महाराज मठ परिसर विकास करणे १० लक्ष, गांजूर लंकेश्वर महाराज मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष, निवळी ज्योतिबा मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कानडी बोरगाव सिद्धेश्वर मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, अंकोली बिरुदेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कारसा विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, सोनवती खंडोबा मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, सारसा गणेशनाथ मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, रेणापूर तालुक्यातील - कोसगाव महादेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, तत्तापूर महादेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, दवणगाव दवनेश्वर मंदिर परिसर विकसित करणे २० लक्ष, खरोळा विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कामखेडा महादेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, माणूसमारवाडी बालाजी हनुमान देवस्थान मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष आणि भादा सर्कल मधील बोरगाव न. माऊली मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, टाका भीमाशंकर मंदिर देवस्थान परिसर विकसित करणे १० लक्ष, उटी बु. जगदंबा देवी मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून १९ गावातील मंदिर, देवस्थान परिसरातील विविध विकास कामासाठी निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## अखेर दंगलखोर मिलिंद एकबोटेवर निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल ...

### - वंचित बहुजन आघाडीची ताकद पुन्हा अधोरेखित

निलंगा /प्रतिनिधी :- वंचित बहुजन आघाडीच्या लातूर जिल्हाध्यक्षा मंजुषाताई निंबाळकर यांच्याशी अर्वाच भाषेत बोलणाऱ्या आणि कथित गोरक्षक संघटनेचा प्रमुख म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिलिंद एकबोटे याच्याविरुद्ध अखेर निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना संपूर्ण जिल्ह्यात संताप आणि निषेधाचे वारे उठवणारी ठरली असून, वंचित बहुजन आघाडीने आपल्या एकजुटीच्या शक्तीने पुन्हा एकदा सामाजिक न्यायासाठी लढण्याची आपली परंपरा दाखवून दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, निलंगा तालुक्यात कथित गोरक्षकांनी एका गरिब मातंग नागरिकाच्या वाहनावर दगडफेक करून त्याचे गंभीर नुकसान केले. त्या नागरिकाला मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागला. ही माहिती मिळताच वंचित बहुजन आघाडीच्या लातूर जिल्हाध्यक्षा मंजुषाताई निंबाळकर, तसेच आघाडीचे अनेक कार्यकर्ते तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पीडित व्यक्तीला दिलासा दिला आणि पोलिस प्रशासनाशी संपर्क साधून न्याय मिळवून देण्याची मागणी केली. घटनास्थळी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते पोहोचल्यावर कथित गोरक्षकांनी तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, कार्यकर्त्यांनी त्यांना जबाब विचारला असता त्यांनी आपला आका दंगलखोर मिलिंद एकबोटे याला फोन लावला. त्या वेळी निलंगा पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (झख) घटनास्थळाशी संपर्कात होते. त्यांनी मंजुषाताई निंबाळकर यांना फोन देत सांगितले की, मिलिंद एकबोटे बोलत आहेत, आपण त्यांच्याशी बोला. फोनवर संवाद सुरू होताच मिलिंद एकबोटे यांनी मंजुषाताई निंबाळकर या एक महिला जिल्हाध्यक्षा असूनही अत्यंत अर्वाच्य, अपमानास्पद आणि असभ्य शब्दांत बोलणे सुरू केले. ताई निंबाळकर यांनी शांततेने आणि सन्मानपूर्वक बोलण्याचा प्रयत्न केला, पण एकबोटे यांनी आपली भाषा आणखीनच खालच्या पातळीवर नेली. या प्रसंगामुळे उपस्थित सर्व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी संतापले. परंतु, त्यांनी संयम राखत कायद्याचा मार्गच योग्य या भूमिकेतून ठामपणे कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

याबाबत मंजुषाताई निंबाळकर यांनी तत्काळ निलंगा पोलीस ठाण्यात औपचारिक तक्रार दाखल केली.त्यानंतर एकबोटेवर यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार कलम ३५२ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.. ही कारवाई झाल्याने वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंद, उत्साह आणि आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'महिलांचा सन्मान सर्वोच्च' घटनेनंतर प्रतिक्रिया देताना मंजुषाताई निंबाळकर म्हणाल्या, मी महिला आहे, आणि एका जबाबदार राजकीय संघटनेची जिल्हाध्यक्षा आहे. अशा जबाबदार पदावर असलेल्या महिलेशी अर्वाच्च भाषेत बोलणे हे समाजातील महिलांचा अपमान आहे. आम्ही कायद्यावर विश्वास ठेवतो आणि न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवू. वंचित आघाडीचा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाचे आभार मानताना सांगितले की, दंगलखोर मानसिकता असणाऱ्यांना कायद्यानेच उत्तर दिले जाईल. वंचित बहुजन आघाडी प्रत्येक अन्यायाविरुद्ध ठामपणे उभी राहील. सामाजिक संदेश या घटनेमुळे समाजात एक ठोस संदेश गेला आहे - कोणताही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठा नाही आणि महिलांच्या सन्मानावर कुणालाही गदा आणू देणार नाही.

# संपादकीय

## महिला सुरक्षेचा प्रश्न

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' असे सुप्रसिद्ध वचन आहे. स्वराज्यातील व परराज्यातील स्त्रियांचा आदर हा केलाच पाहिजे, हा छत्रपती शिवाजी महाराजांचा एक दंडक होता. शिवचरित्राचे अभ्यासक लालजी पेंडसे म्हणतात की, शिवराय हे उपेक्षित, गोरगरीब, कष्टकरी वर्ग तसेच सर्व जातीधर्मातील महिलांबाबत सहृदयी होते. महिला कायम उपेक्षितच असतात याची त्यांना जाण होती. मोगली फौजेतील रायबाघीण शिवरायांच्या विरोधात उमरखिंडीत लढली. त्यात तिचा पराभव झाला. ती पकडली गेली, तेव्हा महाराजांनी आदरसत्कार करून तिला तिच्या छावणीत सुखरूप पोहोचवले. दक्षिण दिग्विजयावरून स्वराज्यात परतत असताना, कर्नाटकातील बेलवाडीच्या किल्लेदार सावित्रीबाई देसाई या शिवाजी महाराजांच्या विरुद्ध लढल्या. त्यावेळी सावित्रीबाईंचा अवमान करणार्या स्वकीय सरदारांना शिवरायांनी शिक्षा केली. अशा या शिवरायांचा वारसा मानणार्या महाराष्ट्राला सध्या झाले आहे तरी काय, असा प्रश्न पडतो. स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटना सातत्याने समोर येत आहेत.

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या घटनेने राज्याला हादरवून सोडले आहे. याप्रकरणी संशयित प्रशांत बनकर याला पोलिसांनी तातडीने अटक केली आणि मुख्य संशयित पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदानेही पोलिसांना शरण आला. बनकर आणि बदाने या दोघांकडून होत असलेल्या शारीरिक आणि मानसिक छळास कंटाळून गुरुवारी रात्री, म्हणजे ऐन भाऊबीजेच्या दिवशीच तिने आत्महत्या केली. महिला डॉक्टरने जीव देण्यापूर्वी आपल्या हातावर एक सुसाईड नोट लिहून ठेवली. त्यात तिने आयुष्याचा शेवट घडवून आणण्याचे कारण आणि त्यासाठी जबाबदार असणार्यांची नावे लिहिली आहेत. माझ्या मरणाचे कारण पोलिस निरीक्षक बदाने असून, त्याने माझ्यावर चारवेळा अत्याचार केल्याचे तिने लिहिले. याशिवाय बनकरने मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचाही उल्लेख त्यात आहे.

बीड जिल्ह्यातील सामान्य शेतकरी कुटुंबातील एक मुलगी प्रतिकूल परिस्थितीशी झगडत मोठ्या कष्टाने डॉक्टर होते. आपल्या गावातून दुसर्या ठिकाणी जाऊन नोकरी करते. फलटण शहरात पेईंग गेस्ट म्हणून राहत असताना, वैद्यकीय सेवेतील सर्व ताणतणाव सहन करते आणि कर्तृत्व सिद्ध करते. परंतु वैद्यकीय तपासणीसंदर्भातील वादातून तिचीच चौकशी सुरू होते. शवचिकित्सेचे किंवा वैद्यकीय तपासणीचे रिपोर्ट आपल्याला सोयीस्कर अशा पद्धतीचे असावेत, यासाठी तिच्यावर दबाव आणला जातो. हे सर्व भयंकर आहे. याबद्दल वरिष्ठांकडे वारंवार गार्हाणी नोंदवूनही दखल घेतली गेली नाही. पीडितेने यासंदर्भात वेळीच अन्य कुणाला सांगितले असते, तर तिचे प्राण वाचले असते, असे सातार्याच्या अतिरिक्त पोलिस अधीक्षक वैशाली कडूकर यांनी म्हटले आहे. त्यांचा मुद्दा बरोबर आहे. कारण नातेवाईक वा मित्र यांना माहिती दिली असती, तर काही हालचाल तरी होऊ शकली असती आणि पीडितेचे प्राण कदाचित वाचू शकले असते.

आता राज्य सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी उपसंचालक भगवान पवार यांच्या अध्यक्षतेखाली तीन जणांची समिती नेमली असून, त्यांच्या मदतीसाठी सातारा जिल्हा रुग्णालयातील काही डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे. फलटण ग्रामीण पोलिस निरीक्षकांनी केलेल्या तक्रारीनुसार, आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टरची चौकशी सुरू होती. समितीसमोर झालेल्या सुनावणीवेळी या पीडितेने आपल्यावर दडपण आणले जात असल्याची तक्रार केली होती. विशेष म्हणजे, याबाबत फलटण उपजिल्हा रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. धुमाळ यांनी, आपल्याला याबाबत काहीच माहीत नसल्याचे म्हटले आहे. मात्र जिल्हा शल्यचिकित्सकांनी पीडितेने तक्रार केल्याच्या माहितीस दुजोरा दिला आहे. हे सर्व लक्षात घेऊन चौकशी समितीला सत्य शोधावे लागेल.

महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी, भाजपचे माजी खासदार रणजित निंबाळकर, त्यांचा भाऊ अभिजित निंबाळकर आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे आमदार सचिन पाटील यांच्यावर आरोप केले आहेत. हे सर्वजण वैद्यकीय अधिकार्यांवर दबाव टाकून चुकीची कामे करायला लावतात, असाही आरोप दानवे यांनी केला. कोणत्याही गोष्टीची शहानिशा न करता, आरोप करणे म्हणजे प्रकरणाचे गांभीर्य कमी करणे होय. महिला अत्याचार वा आत्महत्या प्रकरणात पक्षीय राजकारण हे बेजबाबदारपणाचे लक्षण आहे. आत्महत्या केलेल्या भगिनीला न्याय देणार आणि कोणत्याही राजकीय आरोपांना वा दबावाला बळी न पडता, निष्पक्ष तपास करणार असल्याचे जाहीर आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फलटण येथेच दिले आहे. त्याचप्रमाणे कोणतेही कारण नसताना रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे नाव पुढे करून, निष्कारण बदनामी करण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असेही त्यांनी ठणकावले.

निवासी डॉक्टरांच्या संघटनेने या प्रकरणाची चौकशी सीआयडी किंवा एसआयटीतर्फे करण्याची मागणी केली आहे. पश्चिम बंगालमध्ये एका शिकाऊ महिला डॉक्टरची अत्याचार करून हत्या झाली तेव्हा संपूर्ण देशात प्रक्षोभ निर्माण झाला. देशभरातील डॉक्टरांनी आंदोलनाचा पवित्रा घेऊन, एक दिवसाचा बंदही पुकारला. या प्रकरणात प. बंगालमधील ममता बॅनर्जी सरकारने जनमताचा रेटा आल्यानंतर योग्य ती पावले उचलली. पण, अशा घटना आणि महिलांवरील अत्याचार थांबायला तयार नाहीत. देशभर कुठे ना कुठे या लेकी-बाळांचे शोषण सुरूच आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' घोषणा केंद्र सरकारने दिली असून, अधिकाधिक मुली शिकून उंबरठ्याबाहेर पडू लागल्या आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्या चमकत आहेत. महायुती सरकारने 'लाडकी बहीण' योजना अमलात आणली असून, ती अत्यंत लोकप्रिय झाली. परंतु दुसरीकडे वास्तव चिंताजनक आहे. या लाडक्या बहिणी जर सुरक्षित नसल्या, त्यांना दिमाखाने जगणे अशक्य होत असेल, तर या सगळ्याला काय अर्थ आहे? या स्थितीत महिला सुरक्षेबाबत प्रशासनाच्या आणि व्यवस्थेच्या प्रत्येक स्तरावर झिरो टॉलरन्सचे धोरण कठोरपणे अमलात आणणे आवश्यक आहे. सावित्रीच्या लेकींसाठी तीच खरी ओवाळणी ठरेल.

# परदेशातील भारतीयांची सुरक्षा?

अमेरिकेतील भारतीयांविरुद्ध हिंसाचार वाढत आहे. इंग्लंड, आर्यलंडमध्येही भारतीयांवर हल्ले झाले. त्यामुळे अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडमध्ये भारतीयांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

अमेरिकेचे स्थलांतर धोरण डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात, लक्षणीयरीत्या कठोर झाले आहे. यामुळे केवळ बेकायदेशीर स्थलांतरितांवरच नव्हे, तर कायदेशीर व्हिसाधारक आणि उच्च-कुशल कामगारांवरही गंभीर परिणाम झाला आहे. उपस्थित चिंतांमध्ये बेकायदेशीर भारतीयांवर कठोर कारवाई, एच-१बी व्हिसाच्या संख्येत कथित घट आणि भारतीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशातील घट यांचा समावेश आहे. या बदलांमुळे केवळ अनधिकृत स्थलांतरितांवरच नव्हे, तर कायदेशीर स्थलांतर प्रक्रियांवरही परिणाम झाला. या धोरणांनी विद्यार्थ्यांपासून ते पदवीधरांपर्यंत आणि कुटुंबांपर्यंत सर्वांना प्रभावित केले.

ट्रम्प प्रशासनाच्या कार्यकाळात बाय अमेरिकन, हायर अमेरिकन यासारख्या कार्यकारी आदेशांनी एच-१बी व्हिसा कार्यक्रमात मोठ्याप्रमाणात कठोरता आणली. ट्रम्प प्रशासनाने धोरणात्मक प्राधान्यक्रम बदलले आहेत, ज्यात सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांना पकडण्याचे लक्ष्य आहे. याशिवाय, यूएससीआयएस आता स्वतःचा सशस्त्र अंमलबजावणी विभाग तयार करत आहे, जो फसवणुकीची चौकशी आणि अटक करेल. तसेच, स्थानिक पोलिसांना स्थलांतरितांना अटक केल्यास रोख बक्षिसे देण्याची योजना आहे, ज्यामुळे स्थानिक कायदा अंमलबजावणीचे स्थलांतरणाच्या कामात फेडरलायझेशन होईल.



पीव रिसर्च सेंटरच्या मते, अमेरिकेत सुमारे ७ लाख २५ हजार भारतीय बेकायदेशीरपणे राहत आहेत, ज्यामुळे ते मेक्सिको आणि एलसाल्वाडोरनंतर तिसरा सर्वात मोठा गट ठरतात. आश्चर्यकारकपणे, २०२० ते २०२३ या काळात बेकायदेशीररित्या सीमा ओलांडणार्या भारतीयांची संख्या अनेक पटीने वाढली आहे. डंकी हा धोकादायक आणि बेकायदेशीर स्थलांतरमार्ग पंजाब आणि गुजरातमध्ये लोकप्रिय झाला आहे, जिथे एजंट लोकांना फसवून पैशांच्या बदल्यात धोकादायक मार्गांनी अमेरिकेत पाठवतात.

कठोर धोरणे आणि वाढीव अंमलबजावणी असूनही बेकायदेशीर स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे. याचे एक कारण म्हणजे कायदेशीर व्हिसा पर्यायांची कमतरता आणि दशकांपेक्षा जास्त असलेल्या ग्रीनकार्ड बॅकलॉगमुळे निर्माण झालेली निराशा. जोपर्यंत कायदेशीर स्थलांतराचे मार्ग अडकलेले आणि अवघड असतील, तोपर्यंत लोक धोकादायक मार्गांनी स्थलांतर करण्याचा प्रयत्न करत राहतील. बेकायदेशीर स्थलांतराच्या वाढीमुळे अमेरिकेतील भारतीयांविरुद्धचे वातावरण आणखी नकारात्मक आहे.

अमेरिकेत असलेल्या भारतीयांना वाढत्या कायदेशीर आणि अंमलबजावणीच्या कठोरतेचा सामना करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण पावले उचलणे आवश्यक आहे. स्थलांतर कायद्यातील बदलांमुळे अनिश्चितता वाढली आहे. कोणतीही चूक टाळण्यासाठी तज्ज्ञ स्थलांतरण वकिलांचा सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. १८ वर्षांवरील सर्व स्थलांतरितांनी नोंदणीचे पुरावे (आय-९४) आणि व्हिसाची प्रत नेहमी सोबत बाळगणे आवश्यक आहे, अन्यथा ५ हजार डॉलरपर्यंत दंड होऊ शकतो.

घराचा पत्ता बदलल्यास १० दिवसांच्या आत यूएससीआयएसला कळवणे अनिवार्य आहे, अन्यथा दंडात्मक कारवाई होऊ शकते. तसेच, नोकरी बदलताना किंवा व्हिसा वाढवताना पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे. एच-१बी व्हिसा स्थिती रोजगार आणि पदावर आधारित असते, त्यामुळे कोणतेही मोठे बदल झाल्यास नवीन अर्ज करावा लागतो.

कठोर धोरणे आणि वाढीव अंमलबजावणीमुळे केवळ बेकायदेशीर स्थलांतरितांनाच नव्हे, तर कायदेशीर व्हिसाधारकांनाही दडपणाखाली राहावे लागेल. यूएससीआयएस आता स्वतःच्या सशस्त्र एजंट्सच्या माध्यमातून फसवणुकीची चौकशी करत आहे, त्यामुळे अर्ज भरताना आणि मुलाखतींमध्ये अधिक प्रामाणिक असणे आवश्यक आहे. नोकरीच्या ठिकाणी वाढीव पडताळणीची शक्यता लक्षात घेऊन, आवश्यक कागदपत्रे आणि जॉब डिस्क्रिप्शन नेहमी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

या वातावरणात, कायदेशीर व्हिसाधारकही अनपेक्षित तपासणी आणि कठोर प्रश्नांना सामोरे जाऊ शकतात. म्हणून, कायद्याचे कठोर पालन करणे, सर्व कागदपत्रे जवळ बाळगणे आणि कायदेशीर सल्ल्यासाठी तयार राहणे हे अमेरिकेतील प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वाचे आहे.

भारतात असलेल्या इच्छुकांसाठी मार्गदर्शन-अमेरिका अजूनही उच्च शिक्षणासाठी आणि करिअरसाठी एक प्रमुख केंद्र आहे, पण तेथील स्थलांतरव्यवस्था अत्यंत गुंतागुंतीची आणि अंदाजे नसलेली आहे. विशेषतः एच-१बी धारकांसाठी ग्रीनकार्ड बॅकलॉग एक मोठी समस्या आहे, जिथे ईबी-२ आणि ईबी-३ श्रेणींसाठी ५४ ते १३४ वर्षांची प्रतीक्षा आहे. इच्छुकांनी या दीर्घ अनिश्चिततेसाठी मानसिक तयारी ठेवावी.

या व्यतिरिक्त, व्हिसा फसवणुकीच्या धोक्यांपासून सावध राहा. डंकीसारख्या फसव्या आणि धोकादायक मार्गांचा वापर करू नका. असे प्रयत्न केल्यास अटक, तुरुंगवास आणि निर्वासनामध्ये होऊ शकतो. ट्रम्प प्रशासनाचे स्थलांतर धोरण कठोर आणि व्यापक आहे, परंतु ते पूर्णपणे भारतीय-विरोधी नसून, स्थलांतर-विरोधी आहे, ज्यात भारतीयांवर असमतोल परिणाम होत आहे.

खरे म्हणजे, स्थलांतरितांविरुद्ध अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये राग आहे. आयर्लंडमध्ये भारतीयांविरुद्ध अनेक निदर्शने झाली होती आणि ऑस्ट्रेलियामध्ये अनेक विद्यार्थ्यांना मारहाण झाली आहे. यामुळे, बहुतेक देशांमध्ये स्थलांतरितांविरुद्ध, ज्यामध्ये भारतीयही सामील आहेत, विविध चळवळी सुरू आहेत आणि त्यामुळे तिथे असलेल्या भारतीयांची सुरक्षा धोक्यात आलेली आहे. अर्थात, अमेरिका किंवा युरोपमध्ये सर्वत्र असे होत आहे असे नाही. अनेक भाग सुरक्षितही आहेत, परंतु नेमके कुठले भाग सुरक्षित आहेत याबाबत संशोधन करणे आवश्यक आहे.

# बळीराजाला बळ द्या

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि भारतीय शेती ही बहुतांशी निसर्गावर म्हणजेच पावसावर अवलंबून आहे. पावसाच्या लहरीपणावर या शेतीचे भवितव्यही अवलंबून असते. सध्या महाराष्ट्रामध्ये निसर्गाच्या या लहरीपणामुळेच आणि पावसाच्या अतिरेकीपणामुळे बळीराजासमोर जे संकट उभे राहिले आहे त्या संकटातून त्याला बाहेर काढण्यासाठी केंद्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर बळीराजाला आर्थिक आणि मानसिक बळ देण्याची गरज निर्माण झाली आहे.

मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या बळीराजाला आधार देण्यासाठी विविध प्रकारचे निर्णय जरी घेण्यात आले असले तरी बळीराजाला अपेक्षित असलेला ओला दुष्काळ मात्र जाहीर करण्यात आलेला नाही. कारण सरकारचा कोणताही निर्णय निकषावर असतो आणि ओल्या दुष्काळाचे निकष बदलले असल्याने सध्याची परिस्थिती ओला दुष्काळ जाहीर करण्यासारखी नाही, असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळेच एनडीआरएफच्या निकषाप्रमाणेच काही प्रमाणात मदत शेतकर्यांना दिली जाणार आहे. ही मदत अर्थातच तुटपुंजी असणार आहे आणि बळीराजाला संपूर्णपणे उभा करण्यासाठी ही मदत पुरेशी ठरणार नाही हे उघड आहे.



पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला जर योग्य प्रमाणात पाऊस मिळाला तर शेतीपासून भरघोस उत्पन्न मिळते आणि शेतकर्याला काही प्रमाणात आर्थिक समाधानही मिळू शकते. पण जेव्हा कमी पावसामुळे किंवा जास्त पावसामुळे पिकेच उगवत नाहीत, तेव्हा शेतकर्याच्या हाती काहीच राहत नाही आणि फक्त सरकारी मदतीची आशा त्याच्या डोळ्यात असते. शेती करण्यासाठी विविध प्रकारची कर्जे काढणार्या शेतकर्यांच्या डोळ्यासमोर ही कर्जे कशी फेडायची हाच एक विषय असतो आणि ही कर्जे न फेडता आल्यामुळेच महाराष्ट्रात शेतकर्यांच्या आत्महत्या होत राहतात हे वास्तवही या निमित्ताने लक्षात घ्यावे लागेल.

महाराष्ट्रात गेल्या कित्येक वर्षांमध्ये प्रथमच तब्बल चार महिने पाऊस पडत आहे. ज्या क्षेत्रामध्ये कधीच जास्त पाऊस पडत नाही अशा जिल्ह्यांमध्येसुद्धा पावसाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्याने तेथील पिकेही नष्ट झाली आहेत. या हंगामामध्ये अनेक ठिकाणी शेतकर्यांना दुबार किंवा तिबार पेरण्या कराव्या लागल्या होत्या. तरीही शेतकर्याचे संपूर्ण आर्थिक नियोजन या शेती उत्पादनावर आधारित असते, ते उत्पादनच हाती आले नसल्यामुळे आगामी काळ कसा व्यतित करायचा याची चिंता त्याच्या मनात आहे. अशा परिस्थितीमध्ये राज्य सरकारनेच बळीराजाला बळ देण्याची गरज आहे. कोणत्याही निकषांमध्ये निर्णय गुंतवून न ठेवता किंवा विनाकारण पंचनाम्यासारखे कर्मकांड करण्याची वाट न बघता तातडीने शेतकर्यांपर्यंत ही आर्थिक मदत कशी पोहोचेल हे पाहणे गरजेचे आहे. या पावसाने केवळ शेतीचे नुकसान झाले आहे असे नाही तर पशुधनाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक जनावरांचा मृत्यू झाला आहे. पशुपालनावर अवलंबून असणार्या शेतकर्यांनासुद्धा आगामी काळात आपण जगायचे कसे हा प्रश्न त्यामुळे निर्माण झाला आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच राज्य सरकारने सहानुभूतीनेच सर्व निर्णय घ्यायला हवेत. मुळात एक विषय प्राधान्याने चर्चेला यायला हवा तो म्हणजे हवामान खाते नक्की करते काय? खरे तर अतिवृष्टीचा किंवा पावसाचा इशारा देण्याचे काम हवामान खात्याने योग्यपणे आणि योग्य वेळेत केले तर शेतीच्या नुकसानाचे प्रमाण कमी करणे शक्य असते.

यावेळी हवामान खात्याचीही अंदाज व्यक्त करताना गफलत झाल्याचे दिसते. यावेळी नेहमीपेक्षा जास्त काळ पाऊस पडत आहे. गेल्या कित्येक वर्षांमध्ये पावसाळी हंगाम कधीच चार महिन्यांचा नव्हता. यावेळी चार महिने संपत आले तरी पाऊस सुरूच आहे. पावसामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई जरी संपली असली तरी पिके वाया गेल्यामुळे अन्नधान्याची टंचाई मात्र आगामी कालावधीमध्ये जाणवणार आहे. योग्य प्रमाणात पाऊस पडला असता आणि शेतकर्याची पिके योग्य प्रमाणे उगवली असती आणि त्याला ज्या प्रमाणात त्यापासून उत्पन्न मिळाले असते तेवढेच उत्पन्न शेतकर्याला मिळाले तरच तो या संकटातून उभा राहू शकतो.

साहजिकच तुटपुंजी मदत देऊन काहीही साध्य होणार नाही. सरकारने केंद्र सरकारची मदत घेऊन किंवा इतर अनेक केंद्रीय योजना अमलात आणून बळीराजाचे अश्रू पुसायला हवेत. गरज पडली तर अनेक अनावश्यक खर्च कमी करून तो निधी बळीराजाला आर्थिक निधी देण्यासाठी वळवायला काहीच हरकत नाही.निवडणूक पार्श्वभूमीवर सरकारने ज्या अनेक रेवडी योजना सुरू केल्या होत्या त्यापैकी काही योजना काही कालावधीपुरत्या स्थगित करून तो वाचलेला निधी बळीराजाच्या खात्यात जायला काहीच हरकत नाही.

अशा प्रकारच्या आपत्तीमध्ये नेहमीच सरकारची भूमिका काय राहील याबाबत सगळ्यांचेच लक्ष असते. अशा प्रकारच्या विषयांमध्ये कोणतेही राजकारण न आणता सर्वांनी एकत्रपणे सामोरे जाऊन बळीराजाला बळ देण्याची गरज आहे. कित्येक वर्षात प्रथमच निसर्गाच्या कोपामुळे अभूतपूर्व अशा परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. सर्वांनी एकत्रितपणे आणि गंभीरपणे प्रयत्न केले तरच या संकटातून बळीराजाला बाहेर काढता येणार आहे. कोणतीही लाल फीत समोर न आणता किंवा राजकारण न आणता सर्वच पातळीवर योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात आले तरच बळीराजाला अपेक्षित बळ देता येईल. महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा प्रमुख भाग असलेले कृषी क्षेत्र आर्थिकदृष्ट्या विस्कळीत झाले तर त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या एकूण आर्थिक विकासावरही होणार आहे हे विसरून चालणार नाही.

# कर्करोगग्रस्त तरुणाची काविळीतून मुक्तता!
# हिपॅटिकोगॅस्ट्रोक्टोमी प्रक्रियेमुळे पुढील उपचाराचा मार्ग मोकळा

पुणे : एका तरुण शेतकऱ्याला पित्ताशयाच्या कर्करोगाचे निदान झाले. याचबरोबर त्याला तीव्र कावीळ झाल्यामुळे बिलिरुबीनची पातळी वाढली होती. यामुळे केमोथेरपी उपचार घेण्यास अडथळा येत होता. डॉक्टरांनी या रुग्णावर एंडोस्कोपिक अल्ट्रासाऊंड हिपॅटिकोगॅस्ट्रोक्टोमी प्रक्रिया करत पुढील कर्करोग उपचारासाठी मार्ग मोकळा केला.

या रुग्णाने अन्य ठिकाणी तपासण्या केल्या होत्या. त्यावेळेस काविळीची लक्षणे दिसून आली होती. त्याचबरोबर ताप, खाज, वजन कमी होणे, भूक मंदावणे ही लक्षणेही होती. रुग्णाच्या लिव्हर फंक्शन टेस्ट (एलएफटी) चाचणीमध्ये बिलिरुबीनची पातळी वाढल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सोनोग्राफीमध्ये पित्ताशयात मांसपेशी वाढल्याचे निदर्शनास झाले. त्यामुळे पेट सीटी चाचणी करण्यात आली. त्यात पित्ताशयाचा कर्करोगाचे निदान झाले. तसेच कर्करोग यकृत व लसिका ग्रंथींमध्ये पसरल्याचे आढळले. कर्करोगाची गाठ पित्तनलिकेवर दाब देत असल्याने काविळीचा धोका बळावला. कर्करोग पसरल्याने स्थिती



ही शस्त्रक्रियेने आटोक्यात आणणे शक्य नव्हते, त्यामुळे रुग्णाला पुण्यातील केईएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

याबाबत पोटविकार तज्ज्ञ डॉ. अक्षय काळे म्हणाले की, रुग्णाला काविळीबरोबरच खाज सुटणे, गडद रंगाची लघवी आणि चरबीयुक्त मल अशी लक्षणे होती. यावर उपचार करणे गरजेचे होते, कारण कर्करोगाचे उपचार घेण्यासाठी हा आजार दूर करणे महत्त्वाचे होते. प्रारंभी आम्ही पित्ताचा प्रवाह पूर्ववत करण्यासाठी पित्तनलिकेतील अडथळे दूर करण्याचा विचार केला. पित्ताशयात गाठ असल्याने लहान आतड्याच्या पहिल्या भागावर दाब येत होता आणि पित्तनलिकेपर्यंत पोहोचणे अवघड होते. त्यामुळे या गुंतागुंतीच्या स्थितीत खुली शस्त्रक्रिया किंवा पोट आणि अन्ननलिकेमध्ये संपर्क प्रस्थापित करण्यासाठी केली जाणारी हिपॅटिकोगॅस्ट्रोक्टोमी ही अद्ययावत एंडोस्कोपी प्रक्रिया असे दोनच पर्याय उरले होते. हिपॅटिकोगॅस्ट्रोक्टोमी ही प्रक्रिया आम्ही करायचे ठरवले. या प्रक्रियेनंतर रुग्णाची काविळीतून मुक्तता झाली.

या रुग्णावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या पथकामध्ये डॉ. अक्षय काळे यांच्यासह विभागप्रमुख डॉ. सुहास वागळे, भूलतज्ज्ञ डॉ. जॉयशंकर जाना व डॉ. खंडू पडवळ, तसेच तंत्रज्ञ स्वप्निल पाटील आणि योगेश जाधव यांचा समावेश होता. हिपॅटिकोगॅस्ट्रोक्टोमीची पद्धत हिपॅटिकोगॅस्ट्रोक्टोमीमध्ये एका छोट्याशा सुईने जठराच्या भिंतीमधून पित्तनलिकेत एक छोटीशी सुई टाकण्यात आली. त्यानंतर अंशत: झाकलेला एक जिओबार स्टेंट टाकण्यात आला. त्यामुळे पित्त बाहेर पडण्यासाठी एक मार्ग निर्माण झाला. यातून रुग्णाची काविळीतून मुक्तता झाली. प्रक्रिया झाल्यानंतर त्यादिवशीच संध्याकाळी रुग्णाला द्रवपदार्थ खायला देण्यास सुरुवात करण्यात आली. रुग्णाने ३ ते ४ दिवसांत सामान्य अन्न खाण्यास सुरुवात केली. आठवडाभरात रुग्णाला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

# तीळ तेल, उटणे लावून दिवाळीला अभ्यंगस्नान का करतात? तज्ज्ञ सांगतात आरोग्य फायदे

दीपावली; ज्याला दिवाळी, असेही म्हटला जाणारा हा सण प्राचीन काळापासून साजरा केला जात आहे. दिवाळी म्हटलं की प्रत्येकाला दिवाळीचा फराळ, मिठाई आणि फटाके आठवतात. पण, यात आणखी एक गोष्ट अशी आहे; जी दिवाळीमध्ये आवर्जून केली जाते आणि ती म्हणजे अभ्यंगस्नान. दिवाळीला अभ्यंगस्नानाची परंपरा आहे. पहाटे उठून अंगाला तेल व उटणे लावून, मग अंघोळ केली जाते आणि त्यालाच अभ्यंगस्नान, असे म्हणतात. आयुर्वेदामध्ये अभ्यंगस्नानाला फार महत्त्व आहे. त्याला गंगा स्नान, थैला स्नान असेही म्हणतात.

याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना ज्योतिषी पंडित जगन्नाथ गुरुजी सांगतात, शारीरिक स्वच्छतेसह हे शरीर आणि आत्म्याचे आध्यात्मिक शुद्धीकरण करते. सामान्यत: दीपावलीच्या दिवशी पहाटेच्या वेळी अभ्यंगस्नान करून नवीन दिवसाची सुरुवात केली जाते.

अभ्यंगस्नान कसे करावे? ज्योतिषी पंडित जगन्नाथ गुरुजी यांनी सांगितले, अभ्यंगस्नानाची सुरुवात सूर्योदय होण्यापूर्वी लवकरात लवकर उठून होते; जे पवित्र मनाने आणि भक्तिभावाने उत्सवाचे प्रतीकात्मक स्वागत केल्याचे दर्शवते. सर्वसाधारणपणे कुटुंबाप्रमुखाच्या नेतृत्वाखाली या विधीमध्ये बहुतेक कुटुंबांतील सर्व सदस्यांचा सहभाग असतो.

अभ्यंगस्नानासाठी उपचारात्मक तीळ तेल

अभ्यंगस्नानासाठीच्या तेलात कोणते घटक एकत्र करतात आणि स्नानापूर्वी प्रार्थनेचे महत्त्व स्पष्ट करताना जगन्नाथ गुरुजी म्हणाले, तिळाचे तेल हे त्याच्या उपचारात्मक गुणधर्मांसाठी ओळखले जाते. सामान्यतः आंघोळीसाठी ते वापरले जाते. कधी कधी चंदनाची उटी, लवंग किंवा हळद यांसारखे सुगंधी घटक त्यांच्या शुद्धीकरणाच्या गुणधर्मांसाठी तेलात एकत्र केले जातात. तेल लावण्यापूर्वी एक समृद्ध सुरुवात करण्यासाठी दैवी आशीर्वाद मिळवण्यासाठी प्रार्थना केली जाते.

शुद्धीकरणाची पायरी अभ्यंगस्नानाने आपल्या शरीराचे शुद्धीकरण कसे होते ते विशद करून, जगन्नाथ गुरुजी यांनी सांगितले, गरम केलेल्या तेलाने शरीरावर हळुवारपणे मालिश केले जाते; ज्यामुळे तेल आणि औषधी वनस्पतींचे शरीराला बरे करण्याचे गुणधर्म त्वचेमध्ये प्रवेश करतात. तेल लावल्यानंतर उटणे किंवा नैसर्गिक साबण वापरून कोमट पाण्याने स्नान केल्यावर ही प्रथा पूर्ण होते. शरीरातील जास्तीचे तेल आणि कोणतीही अशुद्धता काढून टाकण्यासाठी ही शुद्धीकरणाची पायरी आवश्यक आहे; ज्यामुळे एखाद्याला ताजेतवाने व टवटवीत वाटेल.

स्नायूंना आराम अन् शरीराला चैतन्य

सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट रुजुता दिवेकर यांनी इन्स्टाग्रामवर एका पोस्टमध्येदेखील सांगितले की, गरम पाण्याने अंघोळ करण्यापूर्वी शरीराला तीळ तेल आणि औषधी वनस्पतींचे तेल लावले जाते. कारण– ते हिवाळ्यासाठी रोगप्रतिकारशक्ती




वाढवणे, वात कमी करणे आणि त्वचेला चांगले पोषण देते. शिवाय गरम तेल आणि गरम पाण्याच्या अंघोळीमुळे मिळणाऱ्या उबदारपणाने रक्ताभिसरण वाढवते, स्नायूंना आराम देते आणि शरीराला चैतन्य देते

मुंबईतील रेजुआ एनर्जी सेंटर ॲक्युपंक्चर(-cupuncture) आणि निसर्गोपचार(Naturopathy) डॉ. संतोष पांडे यांनी अभ्यंगस्नानाचे खालील फायदे नोंदवले आहेत.

१) त्वचेला ओलावा : उबदार तेल त्वचेमध्ये प्रवेश करते. त्यामुळे त्वचेतील ओलावा टिकून राहतो. विशेषत: हिवाळ्यात जेव्हा त्वचा कोरडी आणि रुक्ष होते तेव्हा त्वचेचा कोरडेपणा दूर होण्यास यामुळे मदत होते.

२) रक्ताभिसरणात वाढ : कोमट तेलाने मसाज केल्याने रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते; ज्यामुळे त्वचेच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. चांगले रक्ताभिसरण म्हणजे त्वचेच्या पेशींना पोषक असा ऑक्सिजनचा पुरवठा सुधारणे.

३) अकाली वृद्धत्व टाळण्यास मदत : नियमित तेल लावून अंघोळ केल्याने त्वचेला चांगले पोषण मिळते आणि लवचिकता वाढवून वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते.

४) नैसर्गिक तेज : या विधीमध्ये वापरण्यात येणारे तेल हे बहुतेक वेळा तिळाचे तेल किंवा खोबरेल तेल यांसारख्या नैसर्गिक घटकांसह तयार केलेले असते; जे त्वचेला नैसर्गिक तेज देण्यास मदत करते.

५) आराम मिळतो : अभ्यंगस्नानाने शारीरिक फायदे मिळण्यासह मानसिक विश्रांतीही मिळते. तसेच या स्नानाने तणाव कमी होऊन, मन शांत होते आणि निरोगीपणाची भावना वाढते.

# दिवाळीत घरी आलेल्या पाहुण्यांसाठी बनवा थंडगार चीज चहा, अनोख्या रेसिपीने करा पाहुण्यांचे स्वागत

भारतासह जगभरातील सर्वच देशांमध्ये असंख्य चहाप्रेमी आहेत. काहींना अगदी सकाळी उठल्यापासून ते अगदी रात्री झोपेपर्यंत चहा पिण्यास लागतो. चहाचे सेवन केल्याशिवाय दिवसाची सुरुवातच होत नाही. पण वारंवार चहा पिणे आरोग्यासाठी धोक्याचे ठरू शकते. चहामध्ये असलेल्या घटकांमुळे पचनक्रिया बिघडते आणि शरीरात अनेक बदल दिसून येतात. त्यामुळे जास्त चहाचे सेवन करू नये. दिवाळीनिमित्त घरात मोठ्या संख्येने पाहुणे मंडळी येतात. पाहुण्यांच्या स्वागतासाठी कायमच मिठाई पदार्थ किंवा चहा बिस्कीट, सामोसा इत्यादी ठराविक पदार्थ आणले जातात. पण राज्यासह संपूर्ण देशभरात सगळीकडे कडक ऊन पडले आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाहुण्यांना चहा देण्याऐवजी इतर कोणताही थंड पदार्थ खाण्यास द्यावा. यामुळे पाहुणे सुद्धा आनंदीत होतील. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला चीज चहा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. तुम्ही बनवलेला चीज चहा घरी आलेल्या पाहुण्यांसह इतर सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. चला तर जाणून घेऊया चीज चहा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

ब्लॅक टी

ग्रीन टी

फ्रेश क्रीम

साखर

मीठ

आइसक्यूब्स

दूध

कृती: चीज चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम, भांड्यात एक कप पाणी घेऊन त्यात चहा पावडर टाकून काळा चहा बनवून घ्या. तसेच दुसऱ्या टोपात पाणी गरम करून ग्रीन टी पावडर टाकून चहा उकळवून घ्या.

तयार केलेला चहा पूर्णपणे थंड झाल्यानंतर चहा





गाळून घ्या बर्फाचे खड्डे टाका. यामुळे चहा थंडगार होईल. मोठ्या वाटीमध्ये २ मोठे चमचे क्रीम चीज, २ मोठे चमचे दूध, एक चमचा साखर आणि चवीनुसार मीठ घालून व्हिस्कने व्यवस्थित फेटून घ्या. व्हिस्कने फेटून घेतल्यामुळे सर्व मिश्रण एकत्र मिक्स होईल.

तयार केलेला काळा चहा आणि ग्रीन टी एकत्र मिक्स करून ग्लासात ओतून घ्या. त्यानंतर त्यावर तयार केलेले चीजचे मिश्रण ओतून चहा पाहुण्यांसाठी सर्व्ह करा.तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला थंडगार चीज चहा.

# दर ३ महिन्यांनी 'या' टेस्ट करून घेणं आहे गरजेचं, टाळता येऊ शकतात हार्ट अटॅकसारखे गंभीर आजार

हिवाळा म्हणजे चविष्ट, गरमागरम आणि पौष्टिक पदार्थांचा मौसम! या थंड हवेत गरम वाफाळते वडे खाण्याचा आनंदच काही वेगळा असतो. विशेषतः जेव्हा हे वडे पालकासारख्या हिरव्या पालेभाज्यांपासून बनवले जातात, तेव्हा ते चवीसोबत आरोग्यालाही साथ देतात. पालक ही लोखंड, व्हिटॅमिन ए आणि कॅल्शियमने भरपूर अशी पालेभाजी आहे जी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि हिवाळ्यात शरीर गरम ठेवण्यास मदत करते. आपल्या घरच्या गप्पांच्या कट्ट्यावर, पावसाळी किंवा थंड हिवाळी दुपारी, किंवा एखाद्या छोट्या समारंभात हे पालक वडे अगदी झटपट बनवता येतात. बाहेरून कुरकुरीत आणि आतून नरम, हे वडे चहा किंवा तिखट चटणीसोबत खाल्ले की अगदी मन प्रसन्न होतं. चला तर मग पाहूया, हिवाळ्यात खास बनवण्याची ही सोपी आणि स्वादिष्ट पालक वडे रेसिपी. चला नोट करून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.



साहित्य :

ताजे पालक – २ कप (बारीक चिरलेले)

बेसन – १ कप

तांदळाचे पीठ – २ टेबलस्पून

बारीक चिरलेला कांदा – १

हिरव्या मिरच्या – २ (बारीक चिरलेल्या)

आले–लसूण पेस्ट – १ टीस्पून

धने–जिरे पावडर – १ टीस्पून

लाल तिखट – १ टीस्पून

हळद – ञ टीस्पून

मीठ – चवीनुसार

थोडे पाणी (मिश्रण बनवण्यासाठी)

तेल – तळण्यासाठी

कृती : पालक स्वच्छ धुऊन बारीक चिरून घ्या. त्यातील अतिरिक्त पाणी काढून टाका.

एका भांड्यात बेसन, तांदळाचे पीठ, मीठ, हळद, लाल तिखट, आले–लसूण पेस्ट, धने–जिरे पावडर आणि कांदा घाला.

आता त्यात चिरलेला पालक आणि हिरव्या मिरच्या घालून सर्व चांगले मिसळा.

थोडे थोडे पाणी घालत घट्टसर वड्यांचे मिश्रण तयार करा. मिश्रण फार पातळ करू नका.

कढईत तेल गरम करून घ्या. तेल मध्यम आचेवर गरम असावे.

हाताने किंवा चमच्याने थोडं थोडं मिश्रण तेलात सोडा आणि दोन्ही बाजूंनी सोनसळी रंग येईपर्यंत तळा.

तळलेले वडे टिश्यू पेपरवर काढा जेणेकरून अतिरिक्त तेल निघून जाईल.

गरमागरम पालक वडे हिरव्या चटणी, टोमॅटो सॉस किंवा मसाला चहासोबत सर्व्ह करा.

वड्यांना अधिक कुरकुरीत बनवायचे असल्यास थोडं रवा मिश्रणात घाला. वडे एअरफ्रायरमध्येही शेकून हेल्दी व्हर्जन तयार करता येते.

हिवाळ्याच्या थंडीत गरमागरम पालक वडे म्हणजे घरगुती चविष्ट आनंदाचा बेस्ट पर्याय!

# हेल्दी पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यास सकाळच्या नाश्त्यात बनवा खमंग ज्वारीच्या पिठाचा ढोकळा, नोट करून घ्या रेसिपी

लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं ढोकळा खायला खूप जास्त आवडतो. ढोकळ्याचे नाव ऐकल्यानंतर अनेकांच्या तोंडाला पाणी सुटते. ढोकळा हा गुजराती पदार्थ आहे. गुजरातमध्ये ढोकळा, फाफडा, चाट इत्यादी अनेक पदार्थ खूप जास्त फेमस आहे. जाळीदार मऊ ढोकळा बऱ्याचदा सकाळच्या नाश्त्यात किंवा संध्याकाळच्या वेळी भूक लागल्यानंतर खाल्ला जातो. आज आम्ही तुम्हाला ज्वारीच्या पिठाचा खमंग जाळीदार ढोकळा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. याआधी कायमच तुम्ही बेसन पिठाचा ढोकळा खाल्ला असेल. बेसन पिठाच्या सेवनामुळे शरीराची पचनक्रिया बिघडण्याची जास्त शक्यता असते. यामुळे अन्ननलिकेमध्ये पित्त तयार होण्याची शक्यता असते, ज्यामुळे सतत आंबट ढेकर येतात. त्यामुळे बेसन पिठाचा वापर करण्याऐवजी ज्वारीच्या पिठाचा वापर करावा. ज्वारीचे पीठ शरीरासाठी अतिशय प्रभावी ठरते. यामध्ये असलेले आवश्यक घटक शरीराला तात्काळ ऊर्जा देतात. तसेच हाडांचे आरोग्य सुधारते. चला तर जाणून घेऊया ज्वारीच्या पिठाचा ढोकळा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

ज्वारीचे पीठ

मीठ

आलं

दही

रवा

हिरवी मिरची

बेकिंग सोडा

पांढरे तीळ

कढीपत्ता



मोहरी

जिरं

कृती: ज्वारीच्या पिठाचा ढोकळा बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या भांड्यात ज्वारीचे पीठ, रवा आणि चवीनुसार मीठ घालून एकत्र मिक्स करून घ्या.

त्यानंतर त्यात दही घालून मिश्रण मिक्स करा. तयार केलेले मिश्रण व्यवस्थित फेटून झाल्यानंतर अर्धा तास झाकण मारून बाजूला ठेवून द्या.

त्यानंतर तयार केलेल्या मिश्रणात आल्याची पेस्ट, बारीक चिरलेली हिरवी मिरची आणि पाणी घालून मिक्स करा.

त्यानंतर त्यात चमचाभर तूप घालून व्यवस्थित मिक्स करा. सगळ्यात शेवटी बेकिंग सोडा टाकून ढोकळ्याचे मिश्रण मिक्स करून घ्या.

मोठ्या डब्याला तेल लावून त्यात तयार केलेले ढोकळ्याचे मिश्रण ओतून सेट करून घ्या. त्यानंतर पाणी गरम केलेल्या टोपात

तयार केलेला ढोकळा ठेवून २५ ते ३० मिनिट मंद आचेवर गॅस ठेवून ढोकळा वाफवून घ्या.

ढोकळ्याला एक वाफ आल्यानंतर ढोकळा काढून थंड करण्यासाठी ठेवा. फोडणीच्या वाटीमध्ये तेल गरम करून मोहरी, जिरं आणि हिरवी मिरची, कढीपत्ता घालून भाजा आणि चवीनुसार साखर टाकून मिक्स करा.

तयार केलेली फोडणी ढोकळ्यावर ओतून ढोकळ्याचे तुकडे करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला ज्वारीचा पिठाचा ढोकळा.

# 'वक्त खुद कहेगा... आता 'तुझी' बारी आहे!' या रणभेदी घोषणेने येवता सर्कलमध्ये संभाव्य उमेदवार सौ. प्रगतीताई घुले यांच्या नावाची जोरदार चर्चा

केज/प्रतिनिधी आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर येवता जिल्हा परिषद सर्कलमध्ये भारतीय जनता पार्टी पक्षाच्या संभाव्य उमेदवार सौ. प्रगतीताई सूरज घुले यांनी एका अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी प्रचारमोहिमेचा शुभारंभ केला आहे या ध्येयवादी विचारांमुळे संपूर्ण येवता जिल्हा परिषद सर्कलमध्ये एक नवा उत्साह संचारल्याचे चित्र दिसत आहे व तशा चर्चा जनसामान्यातून ऐकण्यास मिळत आहेत. सौ. प्रगतीताई घुले यांच्या प्रचाराचे मुख्य आकर्षण त्यांचे हे प्रेरक घोषवाक्य ठरले आहे ते सब्र रखो. मेहनत जारी आहे.। वक्त खुद कहेगा.. आता तुझी बारी आहे..!! हे घोषवाक्य कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे आहे. भाजप मध्ये एकनिष्ठ राहुन केलेली अनेक वर्षांची मेहनत आणि प्रतीक्षा आता फळ देण्यास सज्ज झाली आहे, असा आत्मविश्वास कार्यकर्त्यातून व्यक्त केला जात आहे. स्पष्ट भूमिका 'ना वादे, ना बकवास, फक्त विकासाचा ध्यास'सौ. प्रगतीताई घुले यांनी आपल्या प्रचारात स्पष्ट केले आहे की,त्यांची प्राथमिकता केवळ आणि केवळ येवता जिल्हा परिषद सर्कलचा विकास आहे. पोकळ आश्वासने आणि



अनावश्यक गप्पांपासून आपला निवडणूक प्रचार दूर राहील, असे त्यांनी घोषित केले आहे गाव भेटी दरम्यान त्यांनी नागरिकांना दिलेला शब्द हा नागरिकांना योग्य वाटत आहे. प्रगतीताई घुले यांच्या भूमिकेचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे तर त्यांच्या दुसऱ्या घोषणेतून स्पष्ट होतेय की,ना वादे ना बकवास, आत्ता फक्त एकच ध्यास, येवता जिल्हापरिषद सर्कलचा विकास!हा थेट आणि स्पष्ट दृष्टिकोन स्थानिक मतदारांना विशेष आकर्षित करत आहे, जे आपल्या परिसरात ठोस आणि शाश्वत बदलाची अपेक्षा करत आहेत.भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली विकासाचा संकल्प भारतीय जनता पक्षाच्या केजच्या सक्रिय सदस्या असलेल्या येवता जिल्हा परिषद सर्कलच्या संभाव्य सौ. प्रगतीताई घुले यांनी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. त्यांनी मंत्री पंकजाताई गोपीनाथ मुंडे आणि प्रीतमताई गोपीनाथ मुंडे तसेच आ.नमिता मुंदडा यांच्या नेतृत्वात झालेल्या विकासकामांना पुढे नेहण्याचा संकल्प केला आहे. सोशल मीडियावर फिक्स जिल्हा परिषद आणि येवताजिल्हा परिषद यांसारखे हॅशटॅग जोरदार ट्रेंड करत आहेत, ज्यामुळे हे स्पष्ट होते की,येवता सर्कलमध्ये निवडणुकीची हवा आता तापू लागली आहे. सौ. प्रगतीताई घुले आणि त्यांच्या समर्थकांचा ठाम विश्वास आहे की,'सब्र आणि मेहनत'च्या बळावर त्या भाजपने उमेदवारी दिल्यास यावेळी येवता जिल्हा परिषद सीट जिंकून सर्कलच्या विकासाला एक नवी दिशा देतील.

# डॉ.संपदा मुंडे प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी–लखन हजारे





केज /प्रतिनिधी वैद्यकीय अधिकारी डॉ.संपदा मुंडेची आत्महत्या ही नीतिमूल्य हरवलेल्या प्रशासकीय व्यवस्थेचे प्रदर्शन असून एका सर्वसामान्य कुटुंबातील उच्चशिक्षित डॉक्टर तरुणीची आत्महत्या ही समाजाला चिंतेत टाकणारी व भयभीत करणारी आहे या प्रकरणातील दोषींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी अन्यथा संबंध राज्यभर बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन छेडण्यात येईल असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे बहुजन विकास मोर्च्याचे केज तालुकाध्यक्ष लखन हजारे यांनी प्रशासनास इशारा दिला आहे. डॉ. संपदा मुंडेच्या आत्महत्यास कारणीभूत असणाऱ्या पोलीस अधिकारी लोकप्रतिनिधी व इतर संबंधितांवर कोठोरात कठोर कारवाई करून सदर प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा देण्यात यावी डॉ. संपदा मुंडे च्या कुटुंबियांना न्याय देण्यात यावा जर डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबियांना तात्काळ न्याय प्रशासनाने दिला नाही तर बहुजन समाजाच्या रोशाला प्रशासनाला सामोरे जावे लागेल व त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील असे लखन हजारे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# पळसप प्रीमियर लीग २०२५ - पर्व पाचवे उत्साहात संपन्न



पळसप/महेंद्र आल्टे: धाराशिव तालुक्यातील पळसप येथे जिल्हा परिषद मैदानावर दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील पळसप प्रीमियर लीग २०२५ पर्व पाचवे अत्यंत उत्साहात पार पडले रंगतदार सामन्यानंतर 'पावनखिंड एक्सप्रेस' विजेते, 'सिंहगड योद्धा' उपविजेते या दोन्ही संघांनी आपले विजेते पदावर नाव कोरले.विजेता संघ पावनखिंड एक्सप्रेस यांना प्रथम पारितोषिक म्हणून ११,०००/- व आकर्षक विजेतेपदाची ट्रॉफी देण्यात आली. संघाचे मालक मंगेश दादा माळी तर कर्णधार योगेश माळी यांनी उत्कृष्ट नेतृत्व केले.उपविजेता संघ सिंहगड योद्धा यांना ७,०००/- व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या संघाचे मालक प्रकाश दादा तावरे व कर्णधार श्रीकांत लाकाळ होते.वैयक्तिक कामगिरीतही चमक मॅन ऑफ द सिरीज कै. विश्वास बप्पा लाकाळ यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट फलंदाज धन्वंतरी मेडिकल पळसप विशेष सहकार्य ट्रॉफी सौजन्य राजभाऊ लाकाळ मॅन ऑफ द मॅच सन्मानचिन्ह के एल सुभेदार यांच्या स्मरणार्थ राजभाऊ शिरसाट उत्कृष्ट गोलंदाज प्रशांत सोनटक्के उत्कृष्ट वरिष्ठ खेळाडू सुजित गजधने व योगेश माळी उत्कृष्ट खेळाडू अक्षय सुरवसे उत्कृष्ट फलंदाज: अभिजीत लाकाळ उत्कृष्ट गोलंदाज: श्रीकांत लाकाळ उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू: अजय चव्हाण उत्कृष्ट वरिष्ठ खेळाडू: गोपाळ फुटाणे उत्कृष्ट युवा खेळाडू: शिवनयन नरवडे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण प्रथम पारितोषिक ११,०००/- चे दिलीप आप्पा म्हेत्रे यांच्या हस्ते देण्यात आले. द्वितीय पारितोषिक ७,०००/- चे बालाजी भाऊ फुटाणे व सुरेश भाऊ फुटाणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. समारोप समारंभात विजेत्या व उपविजेत्या संघांसह सर्व वैयक्तिक पारितोषिक विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. खेळाडूवृत्ती, स्नेह आणि एकतेचा उत्सव उपसरपंच राम लाकाळ, तंटामुक्ती अध्यक्ष विजय करंजकर सचिन निकम, दत्ता सुरवसे, दयानंद नरवडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.या स्पर्धेचे आयोजन ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागातून करण्यात आले. प्रेक्षकांनी खेळाडूंच्या प्रत्येक चेंडूला टाळ्यांचा कडकडाट देत खेळाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक समिती, व सर्व टीम यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रीतम खरात यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळाचे वाटप व वृद्धांना एलईडी टीव्ही ची भेट



केज/प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाचे केस तालुका उपाध्यक्ष प्रीतम खरात यांच्या वाढदिवसानिमित्त केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप करण्यात आले तर केज शहरालगत असलेल्या बोबडेवाडी रोडवरील स्वामी समर्थ वृद्धाश्रमातील वृद्धांना मनोरंजनासाठी एलईडी टीव्हीची भेट देण्यात आली. वाढदिवसानिमित्त डीजे, फटाक्यांसह इतर अनावश्यक खर्च टाळत राष्ट्रवादीचे केज तालुका उपाध्यक्ष प्रीतम खरात यांनी सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा केला. प्रीतम खरात हे सतत तालुक्यामध्ये सामाजिक बांधिलकी जपत गोरगरिबांचे प्रश्न मार्गी लावत आहेत. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे अध्यक्षिक डॉ.दत्तात्रय केंद्रे, लॅब टेक्निशन श्रीकृष्ण नागरगोजे यांच्यासह डॉक्टरनर्स,ब्रदर, कर्मचारी तर स्वामी समर्थ वृद्ध आश्रमाचे महादेव बापू कराड यांच्यासह वृद्धाश्रमातील आजी- आजोबा व राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस डॉ.उत्तम खोडसे, ज्येष्ठ नेते मालोजी नाना गलांडे, हनुमंत नेहरकर, रोहित हांगे, ड. निखिल बचुटे, संदीप गालफाडे, सागर बनसोडे यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून प्रीतम खरात यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. प्रीतम खरात यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# साबला येथे ऊसतोड कामगार मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साबला येथे आरोग्य विभाग,जिल्हा परिषद , बीड . व ग्रामपंचायत कार्यालय, साबला यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन सरपंच सौ. जनाबाई नरहरी काकडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होत. साबला येथील नागरिक जास्त प्रमाणात ऊसतोडणीसाठी साखर कारखान्यावर ऊसतोड कामगार म्हणुन काम करण्यासाठी ईतर बाहेरच्या राज्यात दुर दुर ठिकाणी जातात म्हणुन त्यांच्या आरोग्याची तसेच गावातील ईतर नागरिकांच्या आरोग्याची काळजी म्हणुन मोफत ऊसतोड कामगार आरोग्य शिबिर घेण्यात आले होते. तसेच ईतर सर्व गावातील नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना तात्काळ औषध , उपचार करण्यात आला . त्यामध्ये बिपी, शुगर , कॅन्सर,एचआयव्ही, हिमोग्लोबिन तसेच सर्व आजारांची तपासणी करण्यात आली . यावेळी साबला नगरितील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. आरोग्य मोफत तपासणी शिबिरातील डॉ. उदय धाट - समुदाय आरोग्य अधिकारी , डॉ.निखील कवडे - समुदाय आरोग्य अधिकारी , डॉ . तौफिक पटेल - समुदाय आरोग्य अधिकारी , श्री संतोष काटे - आरोग्य सहाय्यक , श्री नितिन गलांडे पाटील - आरोग्य सेवक . श्री रामचंद्र आंधळे - आरोग्य सेवक , सौ . शिवप्रभा कोरसाळे - आरोग्य सेविका , सौ . चंपावती सत्वधर - परिचर , श्री शेख सलीम - महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रन कक्ष ग्रामीण विकास यंत्रणा . वरील सर्व वैद्यकिय अधिकारी , कर्मचारी यांच्या उपस्थितीत साबला येथे ऊसतोड कामगार तसेच ईतर सर्व नागरिकांची तपासणी करून त्यांना तात्काळ औषध उपचार करण्यात आला .

साबला येथील ऊसतोड कामगार मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्याचे समाजसेवक तथाआदर्श शिक्षक नरहरी काकडे तसेच ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, गुलाब मुळे,विश्वनाथ नाईकनवरे,गणेश कटारे,लक्ष्मण कटारे , लखन राऊत,रामराजे शिंदे,राहुल मुळे , सौरभ काकडे इत्यादींनी केले.

यावेळी ऊसतोड कामगार यांना ऊसतोड कामगार या प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले.

# भाजप नेत्याने मुस्लिम मुलींच्या संदर्भात केलेल्या 'त्या' विधानावर मायावती भडकल्या




भारतीय जनता पार्टीचे नेते राघवेंद्र प्रताप सिंह यांनी मुस्लिम मुलींच्या संदर्भात केलेल्या आक्षेपार्ह विधानामुळे राजकारण तीव्र झाले आहे. बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत हे घृणास्पद आणि संकुचित विचारसरणीचे विधान असल्याचे म्हटले आहे. अशा लोकांवर कठोर कारवाई केली पाहिजे अशी मागणी मायावती यांनी केली आहे. मुस्लिम मुलगी आणा, नोकरी मिळवा या ताज्या संकुचित आणि घृणास्पद विधानाबरोबरच, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडसह इतर राज्यांमध्ये धर्मांतर, लव्ह जिहाद आणि इतर अनेक नावांचा वापर करून आणि कायदा हातात घेऊन जातीय द्वेष, वैमनस्य, अशांतता, अराजकता भडकवणे आणि लोकांचे जीवन, मालमत्ता आणि धर्म धोक्यात आणणे, हा विषारी आणि हिंसक खेळ अत्यंत निषेधार्ह आहे, असे मायावती यांनी म्हटले आहे. असे गुन्हेगार, अराजक आणि असामाजिक घटक सुसंस्कृत आणि संवैधानिक सरकारला उघड आव्हान आणि धोका निर्माण करतात. त्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी आणि त्यांचे संरक्षण करण्याऐवजी, राज्यातील लाखो लोकांचे हित आणि कल्याण लक्षात घेऊन कायद्याचे राज्य सुनिश्चित करण्यासाठी सरकारने अशा व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. हे व्यापक सार्वजनिक आणि राष्ट्रीय हिताचे आहे असे मायावतींनी त्यांच्या पोस्टमध्ये नमूद केले.उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर जिल्ह्यातील भाजपचे माजी आमदार राघवेंद्र प्रताप सिंह यांनी १६ ऑक्टोबर रोजी एका जाहीर सभेत हिंदू तरुणांना आवाहन करणारे वादग्रस्त विधान केले होते. तसेच हा अखिलेश यादव यांचा काळ नाही, जो मुस्लिमांना खुश करायचा, हा योगीजींचा काळ आहे. घाबरण्याची गरज नाही. तुम्हाला जे काही करायचे ते करा, आम्ही तुमच्यासोबत आहोत, असे दोन हिंदू मुलींच्या कथित अपहरणाच्या घटनेनंतर ते म्हणाले होते.

# जे पी अडव्हरटाईझमेंट अँड मार्केटिंग बिझनेस यांच्या वतीने दीपावली फराळ सोहळा उत्साहात संपन्न

केज /प्रतिनिधी दीपावलीच्या आनंदमयी वातावरणात जे पी अडव्हरटाईझमेंट अँड मार्केटिंग बिझनेसच्या वतीने फराळ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम संचालक प्रशांत हजारे यांच्या पुढाकाराने जे पी अडव्हरटाईझमेंट अँड मार्केटिंग बिझनेस कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमाला सामाजिक,राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.या यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाचे जेष्ठ नेते हारूणभाई इनामदार, केज नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड,शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस भाई मोहन गुंड, रिपाईचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, गटनेते भाऊसाहेब गुंड,रिपाई तालुका उपाध्यक्ष रमेश निशिगंध, रिपाई सरचिटणीस गौतम बचुटे, सुरज काळे,मोटेगावचे सरपंच रामकृष्ण पोळ, कासारीचे सरपंच तथा चेअरमन अमोल डोईफोडे,उत्तम डोईफोडे,तसेच रिपाईचे दिलीप बनसोडे यांच्यासह सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी जे पी ॲडव्हरटाईझमेंट अँड मार्केटिंग बिझनेसचे सर्व कर्मचारीवर्ग,मित्रपरिवार आणि स्थानिक नागरिक मोठ्या उत्साहातसहभागी झाले.कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सुंदर व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.उपस्थित मान्यवरांनी संचालक प्रशांत हजारे यांच्या सामाजिक बांधिलकी, समन्वयक वृत्ती आणि कार्यतत्परतेचे मनःपूर्वक कौतुक केले.कार्यक्रमाच्या शेवटी दीपावलीच्या शुभेच्छा देत सर्वांनी एकमेकांना स्नेहपूर्वक फराळाचे वाटप केले. आणि सणाच्या आनंदात सहभागी झाले.




# लाडकी बहीण योजना पडली महागात, राज्याच्या तिजोरीवर ताण; एका वर्षात किती कोटी झाले खर्च?




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. या योजनेसाठी राज्य सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले आहे. सरकारने मागच्या वर्षभरात या योजनेसाठी ४३ हजार कोटी रुपये खर्च केले आहे. आरटीआयमध्ये याबाबत माहिती उघड झाली आहे.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत जुलै २०२४ ते जून २०२५ पर्यंत ४३,०४५.०६ कोटी रुपये वितरित करण्यात आल्याचे आरटीआय (RTI) कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जात म्हटले आहे. एप्रिल २०२५ मध्ये योजनेचे सर्वाधिक २.४७ कोटी लाभार्थी होते, मात्र जून २०२५ पर्यंत ही संख्या सुमारे ९ टक्क्यांनी घटली.

निकषांच्या आधारे सुमारे अडीच लाख महिलांना वगळल्याने सरकारची ३४० कोटी रुपयांची बचत झाली. मात्र असे असले तरी, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेला ३६,००० कोटी रुपयांचा निधी अपुरा पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची संख्या आणखी कमी न केल्यास सरकारच्या तिजोरीवर मोठा ताण येण्याची शक्यता आहे. पडताळणीमधून हजारो महिला बाद एप्रिल महिन्यात सर्वाधिक महिला लाभार्थी होत्या. २.४७ लाख महिलांना १५०० रुपये देण्यात आहे. जून महिन्यात लाभार्थी महिलांची संख्या कमी झाली. पडताळणीमधून ७७,९८० महिला बाद करण्यात आल्या त्यामुळे सरकारची ३४०.४२ कोटींची बचत झाली. मात्र योजनेच्या सुरुवातीला सरकारने ३६,००० कोटींचा निधी दिला होता. पण, एक वर्षानंतर योजनेवरील खर्चाचा एकूण आकडा समोर आल्यानंतर हा खर्च वाटप केलेल्या निधीपेक्षा जास्त असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मोठा आर्थिक ताण सरकारी तिजोरीवर येत असल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडून ही योजना बंद होणार नसल्याचे आश्वासन देखील महायुतीच्या नेत्यांकडून वारंवार दिले जात आहे.

# अरुणाचलच्या सीमेजवळ चीनने उभारला एअरबेस

तवांग : वृत्तसंस्था चीनने तिबेटमधील लुंजे एअरबेसवर ३६ नवीन हार्डनाइज्ड एअरक्राफ्ट शेल्टर, नवीन प्रशासकीय इमारती आणि एक मोठे विमान पार्किंग क्षेत्र तयार केले आहे. हा एअरबेस मॅकमोहन रेषेपासून ४० किमी आणि अरुणाचल प्रदेशातील तवांगपासून अंदाजे १०७ किमी अंतरावर आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.